# महात्मा गांधींजी यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन

**नमिता अनिलकुमार पाटील,** भोगावती महाविद्यालय कुरुकली.

……………………………………………………………………………………………..

**प्रास्ताविक :**

'जे मुक्त करते ते ज्ञान'- ज्ञानामुळे माणूस आयुष्याच्या चौकट आणि विचारांच्या पलिकडे जाऊन आयुष्याकडे मोकळेपणाने बघु शकतो. आपल्याला जे ज्ञान मिळवायचे ते ज्यातून मिळते अशी कोणतीही गोष्ट म्हणजे एक प्रकारचे शिक्षण असते. म्हणूनच शिक्षणाचा संबंध हा शाळा, कॉलेजमधील अभ्यासक्रमाशी किंवा पाठ्यपुस्तकांशी मर्यादित नसून तो जीवंत अनुभवांशी असतो. अशा अनुभवाधारीत शिक्षण पद्धतीचा मूलगामी विचार करणारे विचारवंत म्हणजे महात्मा गांधीजी होय.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार समजून घेणे.

२) महात्मा गांधींचा जीवन शिक्षणाचा क्रांतिकारक विचार समजून घेणे.

३) महात्मा गांधीजींच्या विविध शैक्षणिक प्रयोगांची माहिती घेणे.

अगदी बालपणापासून म. गांधींचे जीवन व शिक्षणविषयक विचार आकार घेताना दिसतात. यातून त्यांचे शिक्षणविषयक दृष्टिकोन किती सखोल, चिकित्सक होता याचा प्रत्यय येतो. गांधीजींचे बालपण वैष्णवपंथी, धार्मिक वृत्तीच्या, कर्तव्य आणि सेवाभाव बाळगणाऱ्या कौटुंबिक संस्कारात गेले. बालपणीच सत्यनिष्ठेचे मूल्य त्यांच्यात कसे रुजले याचे अनेक प्रसंग ते आपल्या आत्मकथेत मांडतात. ब्रिटिशकालीन इंग्रजी शिक्षणाच्या पुस्तकीपणाचे, स्थानिक समाजजीवनाशी असणाऱ्या संदर्भहीनतेचे आणि दबावाचे अनेक नकारात्मक अनुभव त्यांनी आत्मकथेत नोंदवले आहेत.

कोणताही शिक्षण-विचार हा समाजव्यवस्थेच्या संदर्भात आकार घेत असतो. अत्यंत व्यग्र असे राजकीय जीवन जगत असताना महात्मा गांधीजींचा शिक्षणविषयक विचार विस्तारत होता. महात्मा गांधीजींचा शिक्षणविषयक विचार हा जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून आकार घेत होता. शिक्षण-विचार हा समाजाच्या परिस्थितीशी नाळ जोडत जगण्याला भिडणारा आहे. महात्मा गांधीजींना अपेक्षित असणारे सामाजिक बदल घडवून आणण्याचे सर्जनात्मक सामर्थ्य शिक्षणातून व्यक्तीमध्ये निर्माण व्हावे या दृष्टीने तो विचार विकसित झालेला आहे. मानवी जीवन घडवण्याचे सामर्थ्य शिक्षणामध्ये असेल तर, त्याची बांधणी जीवनातूनच झाली पाहिजे, पुस्तकातून नव्हे. हे आग्रहाने प्रतिपादन करणारा हा विचार आहे.

**मूलभूत शिक्षणाची पायाभूत तत्त्वे :**

१) साक्षरता हे शिक्षणाचे ध्येय नव्हते तर अशा प्रकारच्या शिक्षणातूनच उच्च दर्जाचा मानसिक व आत्मिक विकास साधेल असा म. गांधीजींचा विश्वास होता.

२) सर्व शिक्षण हे स्वयंनिर्वाही असायला हवे, अखेरच्या टप्प्यापर्यंत हस्तकौशल्याचा वापर केला जाईल म्हणजेच विद्यार्थी दिवसातील काही काळ कोणत्यातरी उद्योगात आपले हस्तकौशल्य वापरीत असतील जेणे करून मोठेपणी चरितार्थासाठी एखादा व्यवसायही विद्यार्थ्यांनी आत्मसात करतील.

३) विद्यार्थ्यांना मिळालेल्या सर्व नवीन ज्ञानाचे मातृभाषेत भाषांतर करून त्यांनी ते शाळेजवळील आजूबाजूच्या गावातील लोकांना द्यावे.

४) शिक्षणात कोणत्याही धर्माच्या विशिष्ट पंथाच्या शिकवणीचा समावेश नसावा; परंतु सार्वत्रिक नीतिमूल्ये आणि आपल्या स्वत:च्या धर्माखेरीज इतर सर्व महान धर्मातील मुलभूत तत्वांच्या अभ्यासाचा त्यात समावेश असावा, ज्यायोगे त्या सर्वांचा आदर करण्याची वृत्ती मुलांच्या ठायी निर्माण होईल.

५) अनेक शाळांची स्थापना करण्यापेक्षा शैक्षणिक वातावरणाची निर्मिती करणे अधिक महत्वाचे आहे. खेड्यातील अथवा शहरातील विद्यार्थी मुलभूत शिक्षणाने हिंदुस्थानात जे उत्तम आणि शाश्वत आहे त्याच्याशी जोडला जाईल. त्याच्या मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक क्षमतांचा यामुळे विकास होईल आणि त्यातून दूरवर

पोहचणारी सामाजिक क्रांति घडून येईल. समाजातील असुरक्षितता आणि निरनिराळ्या वर्गामधील विषारी नाते यासारख्या दुष्ट प्रथा नाहीशा करण्यासाठी याचा दुरगामी परिणाम होईल.

"माझी अशी समजूत आहे की, शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक असावे. मुले डोळ्यांनी ग्रहण करतात, त्यापेक्षा कानांनी ऐकलेले कमी श्रमात अधिक ग्रहण करू शकतात" असे मत म. गांधीजींनी आपल्या आत्मकथेत नोंदविले आहे. मुलांच्या सहवासात राहून गांधीजींच्या निरीक्षणात असे आले की, आत्मिक ज्ञान हे पुस्तकांमार्फत देता येत नाही, तर शारीरिक शिक्षण शरीराच्या कसरतीने देता येते. बौद्धिक शिक्षण बुद्धीच्या कसरतीने, त्याचप्रमाणे आत्मिक शिक्षणसुध्दा आत्म्याच्या कसरतीनेच देता येणार. आत्म्याची कसरत शिक्षकाच्या वर्तनानेच प्राप्त होते म्हणून सदासर्वदा शिक्षकाने सतर्क राहिले पाहिजे.

महात्मा गांधीजींचा प्रत्येक विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन इतका मूलगामी होता की, शिक्षण तसेच निरनिराळ्या अभ्यासविषयांवर त्यातील तज्ज्ञ नसूनही फार मोठा प्रभाव पडला आहे.

महात्मा गांधीजींनी प्राथमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, प्रोढ शिक्षण, महिलांचे शिक्षण, व्यावसायाधिष्ठित शिक्षण अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर शिक्षणाचा विचार केला आहे. प्राथमिक शिक्षण हे मोफत आणि सक्तीचे असावे ते मातृभाषेतून देण्यात यावे. त्याचा संबंध भोवतालच्या परिसराशी असावा. या शिक्षण पद्धतीत सूतकताई, विणकाम, शेती, पुस्तक बांधणी, मातीकाम, हस्तकला, बागकाम यासारख्या प्रायोगिक उपक्रमांना प्राधान्य दिले होते. त्याचबरोबर मुलांच्या कला कौशल्याला वाव मिळवून छंद जोपासण्यासाठी समाजशास्त्रासारख्या विषयाबरोबरच चित्रकला आणि संगीत या विषयांनाही अभ्यासक्रमात स्थान दिले होते. कार्यानुभव सारख्या विषयातून परिसर स्वच्छता, शरीर स्वच्छता, शाळेतील बागकाम स्वच्छता यासारख्या उपक्रमांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये केला होता.

महात्मा गांधीजींनी जीवन शिक्षणाचा क्रांतीकारक सिद्धांत मांडला. त्यांच्यामते, ज्ञान जीवनानुभवातून निर्माण होणारे असावे व शिक्षण हे जीवनाला निकट, उपयुक्त पोषक व संवर्धक असावे. केवळ इतरांचे विचार वाचून त्यांची पोपटपंची करणे हे काही खरे शिक्षण नव्हे. बुद्धीचे प्रदर्शन करणाऱ्या पुस्तकी पांडित्यासही शिक्षण म्हणता येणार नाही. आपण घेतलेल्या शिक्षणाने आपल्या काळातील जिव्हाळ्याच्या प्रश्नांना समाधानकारकपणे उत्तरे शोधून काढता आली पाहिजेत. शिक्षणाने मानवी व्यक्तिमत्वाचा विकास झाला पाहिजे. स्वावलंबी, सृजनशील, कृतिशील व स्वतंत्र विचारांची माणसे तयार करावयास शिक्षण समर्थ बनले पाहिजे.

महात्मा गांधीजींनी पाश्चिमात्य पद्धतीची शिक्षणप्रणाली अमान्य करून आपल्या मूलोद्योगी शिक्षणाची योजना तयार केली. म.गांधीजींच्या मते, शिक्षणाचे ध्येय केवळ पोटाचा प्रश्न सोडविणे किंवा भौतिक जीवनाची समृद्धी घडविणे हे असता कामा नये. मानवाला सुंदर, सुसंवादी, निकोप, अखंडित व नीतिमान जीवन घडविण्याची क्षमता शिक्षणामध्ये असली पाहिजे. शिक्षणाने पुरुषार्थी, आत्मविश्वास संपन्न, सृजनशील, न्यायी व समताप्रेमी, नीतिमान व तेजस्वी तरुण घडला पाहिजे. तरच ते खरे शिक्षण म्हणता येईल.

**नयी तालीम, गांधीजींची सर्वोत्तम देणगी:**

१९३७ मध्ये महात्मा गांधीजींनी आपल्या अखेरच्या पर्वत वर्धा-शिक्षण परिषदेच्या माध्यमातून भारत देशाला नयी तालीमचा विचार देतांना म्हणाले होते की, 'ही आपली देशासाठीची शेवटची व सर्वोत्तम देणगी' आहे. नयी तालीमचे ध्येय होते की, शोषणविहीन समतेवर आणि न्यायावर आधारलेल्या लोकशाही समाजाची स्थापना करणे उच्च-नीच भाव नसलेला शहरे व खेडी यातील अंतर नाहीसे करणारा, बुद्धीचे व श्रमाचे काम यातील साम्य दाखवणारा, शिक्षित व निरक्षर यांच्यातील अंतर नाहीसे करणारा, बुद्धीपेक्षा कर्माला महत्त्व देणारा, संयमित व सहयोगी जीवन जगणारा नवसमाज महात्मा गांधीजी घडवू इच्छित होते. धर्मभेद, जातिभेद, भाषाभेद, वर्गभेद मानणारी मानवी वृत्ती शिक्षणातून बदल इच्छित होते. मानवजातीच्या क्रांतिसाठी हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठीचा कार्यक्रम डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखालील अखिल भारतीय हिंदुस्थानी तालिमी संघाच्या माध्यमातून आखला गेला. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसचे प्रांतिक सरकार ज्या ज्या राज्यात होते, त्या त्या राज्यातून

नयी तालीमचे शिक्षण मुलांना देण्याचा व्यापक प्रयोग करण्याचा निर्णय १९३८ च्या हरिपुरा काँग्रेसमध्ये घेतला गेला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नयी तालीम राष्ट्रव्यापी करण्याची भूमिका घेतली गेली. १९३८ पासून १९६० पर्यंत खाजगी संस्थामधून व शासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर कामही झाले. अहिंसक क्रांतिसाठीचा अत्यंत मोलाचा, नवमानवाच्या सर्जनाचा हा व्यापक स्तरावरील रचनात्मक कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी इ.डब्ल्यू. आर्यनायकम, आशादेवी आर्यनायकम, विनोबा किशोरलाल मश्रूवाला,काकासाहेब कालेलकर, मार्जरी साईक्स, धीरेनभाई मुजुमदार, जुगतराम दवे, नानाभाई भट्ट, रविशंकरजी, मनुभाई पांचोली, नारायणभाई देसाई यासारख्या विव्दज्जनांसह अनेक कार्यकर्त्यांनी आयुष्य वेचले.

**समारोप :**

गांधीप्रणीत शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धती होती. शिक्षकाची भूमिका केवळ मार्गदर्शकाची होती. महाविद्यालयीन शिक्षणाचा संबंध राष्ट्राच्या गरजांशी असावा. म. गांधीजींच्या शिक्षण पद्धतीमध्ये एकूणच शैक्षणिक धोरणामध्ये आदर्शवादी, पर्यावरणपूरक, कृतिशील, व्यावसायिक दृष्टीकोन,सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास या सर्वांचा सुंदर मिलाफ असलेला दिसून येतो.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) डॉ . बाचल, वि., मा. भारतीय विचारवंत, के सागर, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००२.

२) कुलकर्णी दिलीप (संपा), गांधी उद्यासाठी, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१९.

३) गोडबोले सुजाता (अनुवादित), गांधीजींचे असामान्य नेतृत्व, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१४.

४) गांधी, मो.कं., सत्याचे प्रयोग आत्मकथा,नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, २०११.